संचार

# मोबाइलचा अतिवापर विद्यार्थ्यांसाठी चिंताजनक

संचार वृत्तसेवा

**उमरगा, दि. १६-** आपल्या शैक्षणिक विकासापेक्षा मोबाइल वापराकडे विद्यार्थ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मोबाइलच्या अतिवापरामुळे आपल्या जगण्यावर विपरीत परिणाम होऊ लागले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोबाइलच्या अतिवापरापासून स्वतःला दूर ठेवावे, असे आवाहन लातूर येथील व्याख्यात्या प्रतीक्षा पांगे यांनी केले.



आदर्श महाविद्यालय, क्रीक हिल फाउंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श महाविद्यालयात हिंदी दिनानिमित्त 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विषयावर प्रतीक्षा पांगे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड होते. उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, प्रा. डॉ. राम सोलंकर, प्रा. डॉ. अनुराधा मिरगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपला ओटीपी कधी अनोळखी व्यक्तींना सांगू नका. फेक लिंकला कधीही क्लिक करू नका, फेसबुक, व्हॉटस्ॲप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट या सोशल मीडियाच्या वापरापासून अठरा वर्षांच्या आतील मुला-मुलींना दूर ठेवा. ऑनलाइन गेमच्या व्यसनामुळे अनेक मुलांना आपले नाहक प्राण गमवावे लागले आहेत. अनधिकृत वेबसाइटच्या फसवणुकीपासून दूर राहा. मोबाइलच्या अतिवापरामुळे आरोग्य धोक्यात येण्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली. मोबाइल वापरावेळी आपली फसवणूक झाल्याचे समजताच १९३० या हेल्पलाइनला संपर्क करावा, असेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. अनुराधा मिरगणे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. तात्याराव चव्हाण यांनी केले. आभार प्रा. डॉ. युवराज जाधव यांनी मानले.

## जळकोट शाळेत राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा

## एक हजार

PIC COLLAGE